**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.१४/०४/२०१९**

**दि.१४/०४/२०१९ रोजी दु.१२/०० वा.ते २१/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सिंहगड रोड पो स्टे ३२१/१८,भादविक ३०२

**फिर्यादी** प्रज्जल माने, वय १९ वर्षे,रा.हिंगणे खुर्द,पुणे मुळ रा.कर्नाटक

**आरोपी** रविंद्र श्रीनिवास जालगी, रा.कर्वेनगर,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/०४/२०१९ रोजी सकाळी १०/०० वा.ते २०/३० वा.चे दरम्यान सर्व्हे नं. ४/२, प्लॉट नं.१२ , शिवपार्वती बंगला फ्लॅट नं.०२ साई मंदिराजवळ, साईनगर, हिंगणे खुर्द,पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी यांची मयत आई-कस्तुरी शेखर माने, वय ४५ वर्षे,रा. सर्व्हे नं. ४/२, प्लॉट नं.१२, शिवपार्वती बंगला फ्लॅट नं.०२ साई मंदिराजवळ, साईनगर, हिंगणे खुर्द,पुणे यांनी त्यांचे मानलेले भाऊ- रविंद्र श्रीनीवास जालगी यांना मागील १० ते १२ वर्षापासुन थोडे थोडे करुन, १४ ते १५ लाख रुपये बहिणीचे लग्न कार्यास मिळतील या उद्देशाने मामाकडे ठेवण्यास दिले होते ते आता कस्तुरी माने यांचे बहिणीचे लग्न ठरल्यामुळे लग्नाकरीता मामा रविंद्र यांना परत मागीतले असता, त्याकारणावरुन मामा नेहमी भांडणे काढत होता. तसेच फिनेल पिण्याचे नाटक करुन, फिर्यादी यांचे आईस घाबरवत होता. तसेच त्या कारणावरुन दि.१२/०४१/२०१९ रोजी रात्रौ १०/०० वा.चे सुमारास मामाने फिर्यादी यांचे आई सोबत भांडण काढुन व फिनेल पिले तसेच फिर्यादी यांचे आईला "तु यापुढे मला पैसे मागितले तर तु किंवा मी यापैकी एकजण कोणीतरी नक्कीच मरणार?" अशी धमकी फिर्यादी यांचे कुटुंबासमक्ष दिली होती. यावरुन दि.१३/०४/२०१९ रोजी सकाळी १०/०० वा.चे सुमारास फिर्यादी हे कामावर गेले असताना, फिर्यदी यांचा मामा रविंद्र व आई असे घरी दोघेच असताना मामाने पैश्यावरुन झालेल्या भंडणाचा राग मनात धरुन आईचा गळा कशाचेतरी सहायाने आवळुन जिवे ठार मारुन कोठेतरी पळुन गेला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. एस.व्ही.उमरे ९९२२९२३०६९

**२**

**पो.स्टे.गुरनं./कलम** फरासखाना पो स्टे १४६/१८,भादविक ३०७,३२३,५०४,३४, महा.पो.का.क.३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५)

**फिर्यादी** साहिल पवार, वय १६ वर्षे,रा.मंगळवार पेठ,पुणे

**आरोपी** चार इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/०४/२०१९ रोजी दु.१६/१५ वा.ते १६/३० वा.चे दरम्यान काचीमळा मंगळवार पेठ,पुणे यांचे घराजवळ

**तपशिल** वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व त्यांचे मित्र गौस शेख व आतिश गायकवाड यांचे बरोबर इंदिरानगर काचीमळा येथील सार्वजनिक शौचालयाजवळ गप्पा मारत बसले होते. त्यावेळी अचानक फिर्यादी यांचे ओळखीचे यातील नमुद चार इसम समोर आले त्यांचेपैकी एकाने फिर्यादी यांना पाहुन याचे हातपाय तोडा हे आपल्याला खुन्नस देतात असे म्हणाल्याने ते तिघेजण तेथुन पळुन जात असताना, फिर्यादी हे नमुद ठिकाणी घराच्या लोखंडी शिडीला धडकुन खाली पडले त्यावेळी फिर्यादी यांचे मित्र हे पुढे पळुन गेले, फिर्यादी खाली पडल्यानंतर नमुद इसमांनी त्यांचे हातातील कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यात जिवे मरण्याचे उद्देशाने वार केला परंतु तो फिर्यादी यांनी चुकवला असता तो फिर्यादी यांचे डावे हातावर व उजवे हातावर, तसेच दोन्ही पायाचे गुडघ्यावर वार करुन, फिर्यादी यांना गंभीर जखमी केले त्यावेळी फिर्यादी हे वाचवा वाचवा असे आरडाओरडा करीत असताना, फिर्यादी यांचा मित्र प्रदिप खंदारे हा फिर्यादी यांना वाचवण्यासाठी मध्ये आला असता त्यापैकी एकाने प्रदिप खंदारे याचे मानेजवळ पाठीवर कोयत्याने वार करुन, त्यास जखमी केले आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. ए.एन.घुले ९९२३१००१७५

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**